# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 21.04.2025** **वार- सोमवार**

---

**पिंकईरिक्शा**

पिंक रिक्षाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण करण्याचा उद्देश असून  महिलांना मुख्य प्रवाहात आणण्याचं काम हे सरकार करत आहे. राज्यात लाडक्या बहिणी आमच्या मागे उभ्या राहिल्या, आता हे सरकार त्यांच्या मागे उभं आहे, असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज पुण्यात केलं. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत आणि महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांच्या हस्ते आज पुण्यात ६० पिंक रिक्षाचं वाटप लाभार्थींना करण्यात आलं. त्यावेळी ते बोलत होते. लाडकी बहीण योजनेनंतर राज्यातील महिला आणि बालविकास विभागा मार्फत राज्यातील १० हजार पात्र महिलाना पिंक ई रिक्षा योजनेचा लाभ देण्यात येत आहे.या योजनेसाठी ८० कोटी रुपये मंजूर केल्याचं पवार यांनी यावेळी सांगितलं.

राज्यातल्या आठ जिल्ह्यात १० हजार पिंक ई-रिक्षांचं वाटप करण्यात येत आहे. पुण्यासह नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, कोल्हापूर, अहिल्यानगर आणि अमरावती या आठ जिल्ह्यात टप्प्याटप्प्यानं पिंक रिक्षा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत, असं अदिती तटकरे यांनी यावेळी सांगितलं. पिंक रिक्षाच्या एकंदर किमतीपैकी २० टक्के अनुदान राज्य सरकार देणार असून दहा टक्के रक्कम लाभार्थी महिलांना द्यावी लागणार आहे. तर उर्वरित ७०टक्के रक्कम सवलतीच्या व्याजदरावर कर्ज म्हणून

उपलब्ध करून दिली जात आहे. या कार्यक्रमात ६० पिंक रिक्षाचं वाटप करण्यात आलं. त्यापैकी ३८ पुणे तर २२ पिंपरी चिंचवड शहरातील लाभार्थी आहेत.

**<u>ई-टॉयलेट</u>**

नागरिकांच्या सोयीसाठी खासदार निधीतून दोन कोटी रुपये खर्च करून पुण्याच्या विविध भागांत उभारलेल्या आणि गेल्या काही वर्षांपासून बंद अवस्थेत असलेल्या अत्याधुनिक शौचालयांवर पुन्हा खर्च करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. या ई टॉयलेटची पुन्हा तोडफोड होऊ नये, तसंच त्यातील साहित्याची चोरी होऊ नये, यासाठी त्यांच्या जागा बदलण्याचा निर्णयही घेण्यात आल्याची माहिती महापालिकेचे उपायुक्त आणि घनकचरा विभागाचे प्रमुख संदीप कदम यांनी आज दिली.

**<u>पक्षी</u>**

फर्ग्युसन महाविद्यालयाच्या आवारात यंदा पक्ष्यांच्या 81 प्रजाती आढळून आल्या; युरोपातून स्थलांतर करून आलेल्या ग्रीन वॉर्बलर, रेड ब्रेसेड फ्लायकॅचर आणि ट्री पपेट या पक्ष्यांचा त्यात समावेश आहे. महाविद्यालयाच्या नेचर क्लबने या वर्षी 14 ते 17 फेब्रुवारी या कालावधीत पक्षी गणना केली. त्यामध्ये 68 विद्यार्थ्यांनी भाग घेतला. फर्ग्युसन महाविद्यालयाचा आवार जैववैविध्यानं संपन्न असल्याने या परिसरात ऑक्टोबर ते फेब्रुवारी दरम्यान परदेशी पक्षी वास्तव्य करतात, असं वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मीनाक्षी महाजन यांनी सांगितलं.

जीबीएस

गुइलेन बॅरे सिंड्रोमचा म्हणजे  जीबीएस उद्रेक कोंबड्यांमुळे झाल्याचा प्राथमिक निष्कर्ष आहे. याबाबत संशोधन सुरू असून लवकरच अंतिम निष्कर्ष हाती येईल,' अशी माहिती राष्ट्रीय विषाणूविज्ञान संस्थेचे संचालक डॉक्टर नवीन कुमार यांनी आज पुण्यात दिली. जनरल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

**<u>सुधीर रसाळ</u>**

'साहित्यकृतीनं वाचकांना आनंद द्यावा तसंच साहित्यकृतींच्या समीक्षात्मक मूल्यमापनासाठी वाचकांचीही पूर्वतयारी हवी', अशी अपेक्षा ज्येष्ठ संपादक आणि  राजहंस प्रकाशनाचे प्रमुख दिलीप माजगावकर यांनी नुकतीच पुण्यात व्यक्त केली. 'अक्षर वाङ्मय' या नियतकालिकातर्फे तयार करण्यात आलेल्या सुधीर रसाळ विशेषांक प्रकाशन समारंभात ते बोलत होते.

**<u>जिद्द पुरस्कार</u>**

आडकर फौंडेशनतर्फे गुरुद्वारा श्री गुरू सिंघ सभेचे अध्यक्ष भोलासिंह अरोरा यांना जिद्द जीवनगौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. पुरस्कार वितरण शिखर बँकेचे अध्यक्ष विद्याधर अनास्कर यांच्या हस्ते येत्या  27 एप्रिल रोजी होणार आहे.

<u>pcmc</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर संकलन आणि कर आकारणी विभागानं २०२५-२६ या आर्थिक वर्षातही महिला बचत गटांच्या मार्फत कर देयकांचं वाटप सुरू केलं आहे. देयकं वाटप करणाऱ्या महिलांना महानगरपालिकेनं ओळखपत्रही दिली असून ३१ मी पर्यंत सर्व देयक वितरीत करण्याचं नियोजन आहे.

**<u>बनावटपनीरकारवाई</u>**

बनावट पनीर किंवा चीज ॲनालॉग वापरणाऱ्यांवर अन्न आणि औषध प्रशासन विभागामार्फत कडक कारवाई करण्यात येत आहे. बनावट पदार्थांची विक्री केल्याचं आढळून आल्यास अशा व्यावसायिकांचे

परवाने रद्द करण्यात येणार असल्याचं अन्न आणि औषध प्रशासन विभागानं स्पष्ट केलं आहे.

**<u>क्रीडा</u>**

कर्नाटक मध्ये मुलींच्या उप कनिष्ठ गटाच्या राष्ट्रीय हँडबॉल स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ सज्ज झाला असून पुणे जिल्ह्यातील तीन खेळाडूंना संघात स्थान देण्यात आलं आहे. पुण्यातील तनया पाटील, सिद्धी गांधी आणि प्रणिती शिंदे या खेळाडूंचा महाराष्ट्राच्या संघात समावेश करण्यात आला आहे. ही स्पर्धा श्रीरंगपट्टणम इथं 30 एप्रिल ते 4 मे या कालावधीत होणार आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज आकाश मुख्यतः निरभ्र होतं. कमाल तापमान 39 तर किमान तापमान 20 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**